राज्यातील २६ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २९७ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका - २०१७ निवडणूक विभाग, निर्वाचक गणांची रचना व आरक्षणाची सोडत काढण्याचा कार्यक्रम

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.१६/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १८/०८/२०१६

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त,

२) सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम,भंडारा व गोंदिया वगळून)

**विषय :- राज्यातील २६ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २९७ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका -२०१७ निवडणूक विभाग, निर्वाचक गणांची रचना व आरक्षणाची सोडत काढण्याचा कार्यक्रम**

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस/२०११/प्र.क्र.१२/का.७, दि.२९/०९/२०११
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक. रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७, दि.०४/१०/२०११ तसेच शुध्दीपत्रक दि.११/०६/२०१४
३) राज्य निवडणूक आयोगाची समक्रमांकाची दिनांक १८/०८/२०१६ ची अधिसूचना

महोदय/महोदया,

आपणास ज्ञात आहे की, राज्यातील २६ जिल्हा परिषद व त्याअंतर्गत असलेल्या २९७ पंचायत समित्यांची मुदत सन २०१७ मध्ये संपत असल्याने तत्पूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणूका घेणे बंधनकारक आहे.

२. आपणाकडून प्राप्त सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जिल्हा परिषद क्षेत्रातील ग्रामीण लोकसंख्येनुसार राज्य निवडणूक आयोगाने दि.१८/०८/२०१६ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९(१) नुसार जिल्हा परिषदेकरिता देय असलेली

एकूण सदस्य संख्या निश्चित केली आहे. सदर अधिसूचनेची प्रत सोबत जोडली आहे.

(२.१) अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेस देय असलेल्या एकूण सदस्य संख्येची पंचायत समिती क्षेत्रनिहाय विभागणी करणे, आरक्षण ठरविणे, पंचायत समितीस देय असलेल्या जागा व त्यांचे आरक्षण निश्चित करणे ही संबंधित जिल्हाधिकारी यांची जबाबदारी आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध माहितीच्याआधारे जिल्हा परिषदेस अनुज्ञेय ठरत असलेल्या निवडणूक विभागांच्या संख्येबाबतचा तपशिल (आरक्षित प्रवर्गाच्या जागांसह), अनुज्ञेय ठरत असलेल्या जागांचा तपशील तयार करण्यात आला असून तो प्रपत्र-१ व प्रपत्र-२ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे. सदरचे प्रपत्र-१ व प्रपत्र-२ हे केवळ उदाहरण म्हणून सोबत जोडण्यात येत आहे. मात्र वर नमूद केल्याप्रमाणे यासंदर्भात संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकारी यांचीच असल्याने सदरची आकडेवारी काळजीपूर्वक तपासून आवश्यक असल्यास त्यामध्ये योग्य ते फेरबदल राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशनास आणून करण्यात यावेत.

३. **आता या पत्राद्वारे मुदत संपणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी प्रभाग रचना व आरक्षण निश्चिती करण्याबाबतचे वेळापत्रक सोबतच्या प्रपत्र-३ मध्ये देण्यात येत आहे.** प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीबाबतचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना राज्य निवडणूक आयोगाकडून संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत.

४. प्रभाग रचना करण्याचे मुख्य टप्पे खालीलप्रमाणे आहेत :-

(i) जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) तयार करणे व विभागीय आयुक्त यांना सादर करणे.

(ii) विभागीय आयुक्तांनी प्रारुप प्रभाग रचनेस (आरक्षणासह) मान्यता देणे.

(iii) जिल्हाधिकारी यांनी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे.

(iv) सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) राजपत्रात इ. प्रसिध्द करणे

(v) जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त यांनी सुनावणी देणे.

(vi) विभागीय आयुक्त यांनी अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना राजपत्रात इ. प्रसिध्दी देणे.

५. तरी प्रभाग रचना करताना जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

**(५.१) प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) तयार करणे व विभागीय आयुक्त यांना सादर करणे:-**

(i) महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, १९९६ मधील तरतुदीनुसार व राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७, दि.०४/१०/२०११ (प्रत संलग्न) व दि.११/०६/२०१४ (प्रत संलग्न) अन्वये जिल्हाधिकारी यांनी निवडणूक विभाग व निर्वाचक गण यांची अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना करावी व त्याचे प्रारुप विहित मुदतीत विभागीय आयुक्त यांना सादर करावेत. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ सन २०१७ ची चौथी निवडणूक आहे. त्यामुळे सन २००२, २००७ व २०१२ मध्ये असलेले आरक्षण विचारात घेऊन या निवडणुकीमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे.

(ii) उपरोक्त दि.०४/१०/२०११ च्या आदेशात नमूद परिच्छेद-२(६-अ) बाबत स्पष्ट करण्यात येते की, अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची लोकसंख्या १० टक्के मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त होत असल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी त्याबाबत समर्थनीय कारणे नमूद करुन प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना सादर करावा. विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांनी दिलेली कारणे संयुक्तिक आहेत किंवा नाहीत हे तपासून प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देण्यासंदर्भात त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.

(५.२) जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) प्रस्तावांना विभागीय आयुक्तांनी विहित मुदतीत मान्यता दयावी.

(५.३) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला आरक्षणाची सोडत :-

प्रारूप प्रभाग रचनेस विभागीय आयुक्त यांचेकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त परिच्छेद ५.१ (i) मधील नमूद नियम व आदेशानुसार नागरिकाचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) यांच्या आरक्षणाची सोडत काढण्याबाबतची जिल्हाधिकारी यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी :-

अ) जिल्हा परिषदांच्या बाबतीत जिल्हा स्तरावर ही सोडत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समित्यांच्या बाबतीत तालुक्याच्या मुख्यालयी, संबंधित तहसिलदारांकडून काढण्यात यावी.

ब) तालुका मुख्यालयात काढण्यात येणाऱ्या सोडतीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समित्यांकरिता एक उपजिल्हाधिकारी यांची नेमणूक करावी.

क) निवडणूक विभाग, निर्वाचक गणांच्या हद्दी दर्शविणारा नकाशामध्ये विभाग व गण यांचे क्रमांक व त्यांच्या चतु:सीमा स्पष्ट कराव्यात व हा नकाशा सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावावा.

ड) सोडतीसाठी पारदर्शक ड्रम / काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार १५ x १५ से.मी.पेक्षा जास्त नसावा. त्यावर लावण्यात येणारे रबर बॅण्ड एकाच रंगाचे असावेत.

इ) सोडतीसंबंधीच्या सूचनेस जिल्हास्तर व तालुकास्तरावर नेमून दिलेल्या दिनांकास मोठया प्रमाणात प्रसिध्दी दयावी. उदा.

(a) जिल्हाधिकारी, तहसिलदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयातील नोटीस बोर्ड

(b) जिल्हा कार्यालय / जिल्हा परिषदेची वेबसाईट

(c) जिल्हयातील जास्त वाचकवर्ग असलेल्या वर्तमानपत्रात

(d) केबल टि.व्हि व इतर माध्यमे, इत्यादी.

**(५.४) सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) प्रसिध्द करणे .**

(i) नगर परिषदा /नगर पंचायतीच्या बाबतीत "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५" मधील तरतुदीनुसार सर्व आरक्षण नमूद करुनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. त्याच धर्तीवर जिल्हा परिषद / पंचायत समित्यांमध्ये देखील सोडतीमध्ये आलेले आरक्षण नमूद करुनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेली कार्यपध्दती योग्य असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक-३६४८/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयात नमूद केलेले आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समान पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याने, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांसह) यांच्याकरिता प्रभाग आरक्षित करुनच प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करावी.

(ii) प्रारुप प्रभाग रचनेच्या अधिसूचनेस व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व स्विकारण्यास सक्षम असलेले प्राधिकारी यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्ड, वेबसाईट इत्यादी.)

**(५.५) <u>प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे</u> :-**

(i) जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रारुप प्रभाग रचनेवर विहित मुदतीत प्राप्त हरकती जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी संकलित करुन त्या विभागीय आयुक्तांना सादर कराव्यात.

(ii) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकतींवर विभागीय आयुक्त यांनी स्वत: सविस्तर सुनावणी दयावी. असे करीत असताना जास्तीत जास्त पारदर्शकता राखली जाईल याची काळजी घ्यावी. निकाली काढण्यात येणाऱ्या हरकतींबाबतही, संबंधीतांना कायदयातील तरतुदी, भौगोलिक रचना, बदलांची आवश्यकता / अनावश्यकता यांच्याआधारे योग्य तो खुलासा करावा, जेणेकरुन न्यायप्रविष्ठ प्रकरणे कमी होतील. मात्र हरकतदारांना लेखी उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

(iii) सुनावणीनंतर विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम करावे.

**(५.६) अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व प्रसिध्दी करणे-**

(i) विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी त्यासंबंधीची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी व सदर अधिसूचनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्ड, वेबसाईट इत्यादी.) तसेच अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेच्या दोन प्रती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

६. **सर्वसाधारण**

या आदेशासंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास यासंदर्भात खुलासा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे असतील.

७. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची प्रभाग रचना अंतिमरित्या प्रसिध्द होईपर्यंत सर्व टप्प्यांवरील माहिती (विहित नमुन्यात) आयोगाच्या कार्यालयास ई-मेल sec.mh@gov.in वर वेळच्यावेळी पाठविण्यात यावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि.ज.वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्र:रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र. १६ /का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १८/०८/२०१६

# अधिसूचना

क्रमांक: रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.१६/का.७ - महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ ( १९६२ चा महा.५) (यानंतर याचा उल्लेख " उक्त अधिनियम" असा केला आहे.) चे कलम ९ च्या उपकलम (१) मधील तरतुदीनुसार आणि यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करुन, राज्य निवडणूक आयोग, सन २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येच्याआधारे, खालील तक्त्यातील रकाना क्र.२ मध्ये नमूद करण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या बाबतीत त्या जिल्हा परिषदेच्या नावासमोर रकाना क्र.३ मध्ये नमूद केलेल्या संख्येइतकी सदस्य संख्या आगामी निवडणुकीकरिता निश्चित करीत आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ५८(१)(अ) नुसार जिल्हा परिषदेचा प्रत्येक निवडणूक विभाग दोन निर्वाचक गणांमध्ये विभागण्यात येईल.

## अनुसूची
## जिल्ह्यानुसार जिल्हा परिषदेस देय होणारी सदस्य संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा परिषदा | निश्चित केलेली एकूण सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | रायगड | ६१ |
| २ | रत्नागिरी | ५५ |
| ३ | सिंधुदुर्ग | ५० |
| ४ | नाशिक | ७३ |
| ५ | जळगाव | ६७ |
| ६ | अहमदनगर | ७३ |
| ७ | पुणे | ७५ |
| ८ | सातारा | ६४ |
| ९ | सांगली | ६० |
| १० | सोलापूर | ६८ |
| ११ | कोल्हापूर | ६७ |

| | | |
|---|---|---|
| १२ | औरंगाबाद | ६२ |
| १३ | जालना | ५६ |
| १४ | परभणी | ५४ |
| १५ | हिंगोली | ५२ |
| १६ | बीड | ६० |
| १७ | नांदेड | ६४ |
| १८ | उस्मानाबाद | ५५ |
| १९ | लातूर | ५८ |
| २० | अमरावती | ५९ |
| २१ | बुलढाणा | ६० |
| २२ | यवतमाळ | ६१ |
| २३ | नागपूर | ५८ |
| २४ | वर्धा | ५२ |
| २५ | चंद्रपूर | ५६ |
| २६ | गडचिरोली | ५१ |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
प्रभारी उप सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

( आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.१६ /का.७, दि.१८/०८/२०१६ सोबतचे प्रपत्र)

## प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम

## प्रपत्र-३

## सन २०१७ मध्ये होणाऱ्या २६ जिल्हा परिषदा व २९७ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका- २०१७ करिता प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | **प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीकरिता आरक्षणासह) विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे** (जिल्हा परिषद क्षेत्राची निवडणूक विभागामध्ये व पंचायत समिती क्षेत्राची निर्वाचक गणामध्ये विभागणी करुन ) | जिल्हाधिकारी | शुक्रवार ०९/०९/२०१६ पर्यंत |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे | विभागीय आयुक्त | शुक्रवार २३/०९/२०१६ पर्यंत |
| ३. | **आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे** { नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) बाबत } | जिल्हाधिकारी | बुधवार २८/०९/२०१६ पर्यंत |
| ४. | **आरक्षणाची सोडत काढणे** { नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) बाबत } | | |
| | अ) जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी | जिल्हाधिकारी | बुधवार ०५/१०/२०१६ |
| | ब) पंचायत समिती निर्वाचक गणासाठी | तहसिलदार | |
| ५. | **प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करणे** (निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना व आरक्षणासह) | जिल्हाधिकारी | सोमवार १०/१०/२०१६ |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| ६. | जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | | सोमवार १०/१०/२०१६ ते गुरुवार २०/१०/२०१६ पर्यंत |
| ७ | प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देऊन निवडणूक विभाग /निर्वाचक गण रचना अंतिम करणे | विभागीय आयुक्त | गुरुवार १७/११/२०१६ पर्यंत |
| | **क) अंतिम प्रभाग रचना** | | |
| ८. | अंतिम प्रभाग रचना व आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | शुक्रवार २५/११/२०१६ |

**टिप :- विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफीसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा.**

( नि.ज.वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

RNI No. MAHBIL/2009/31748

Reg. No. MH/MR/South-324/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ३, अंक ५० ] सोमवार, ऑक्टोबर ३, २०११/आश्विन ११, शके १९३३ [ पृष्ठे १, किंमत : रुपये २०.००

**असाधारण क्रमांक १२२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ सप्टेंबर २०११

## आदेश

**जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभाग व पंचायत समिती क्षेत्रातील निर्वाचक गणांची प्रभाग रचना**

क्रमांक रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र. १३/का. ७.—भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियमातील कलम १२ व ५८ याद्वारे प्राप्त झालेल्या अधिकारांचा व याबाबत असलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून मी, नीला सत्यनारायण, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :—

| अनुक्रमांक (१) | करावयाची कार्यवाही (२) | ते करण्यासाठी जबाबदार अधिकारी (३) |
|---|---|---|
| (१) | जिल्हा परिषद क्षेत्राचे निवडणूक विभागामध्ये विभाजन करणे पंचायत समिती क्षेत्राचे निर्वाचक गणामध्ये विभाजन करणे, त्यांच्या सीमा निश्चित करणे. | विभागीय आयुक्त. |
| (२) | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षण ठरविणे. | विभागीय आयुक्त. |
| (३) | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व नागरीकांच्या मागासवर्गातील महिलांसह) यांच्या आरक्षणासाठी सोडत काढणे. | |
| | (अ) जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागाकरिता | जिल्हाधिकारी. |
| | (ब) पंचायत समितीच्या निर्वाचक गणासाठी | संबंधित तालुक्याचे तहसिलदार (ह्याबाबत देखरेख ठेवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी उप जिल्हाधिकारी यांना नियुक्त करावे.) |
| (४) | निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेचे प्रारूप प्रसिद्ध करणे | जिल्हाधिकारी. |
| (५) | निवडणूक विभाग व निर्वाचक गण यांच्या हरकती व सूचना स्वीकारणे | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला उप जिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी. |
| (६) | निवडणूक विभाग व निर्वाचक गण यासंबंधी प्राप्त झालेल्या हरकती व सूचना यांना सुनावणी देऊन रचना अंतिम करणे. | विभागीय आयुक्त. |
| (७) | अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करणे. | जिल्हाधिकारी. |

याबाबत यापूर्वी काढलेले सर्व आदेश या आदेशामुळे सुधारित करण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल.

**नीला सत्यनारायण,**

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT

सत्यमेव जयते

**जिल्हा परिषद क्षेत्राची निवडणूक विभागामध्ये पंचायत समिती क्षेत्राची निर्वाचक गणामध्ये विभागणी करण्याबाबत सुधारीत आदेश.**

राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७,
नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- ०४ ऑक्टोबर, २०११

## आदेश

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अन्वये राज्य निवडणूक आयोगावर जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविलेली आहे. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया प्रभाग रचना करण्यापासून सुरू होते व प्रत्यक्ष मतदान होऊन निकाल शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर ही जबाबदारी संपते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १४ मध्येदेखील ही जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर टाकण्यात आली आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील निवडणूक विषयक तरतूदी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक (निवडणूक विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ व महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणूक (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ यामधील तरतुदींचे पालन करून जिल्हा परिषदांसाठी निवडणूक विभाग व पंचायत समित्यांसाठी निर्वाचक गण तयार करण्यात येतात. आरक्षणासंबंधी तरतूद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (जागांच्या आरक्षणाची पध्दती व चक्रानुक्रम) नियम, १९९६ यामधील तरतुदीनुसार करावी लागते. जिल्हा परिषद व पंचायत समिती यांची निवडणूक विभाग व निर्वाचक गणात रचना करताना त्यामध्ये सुसूत्रता राहावी म्हणून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून मी नीला सत्यनारायण, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र आयोगाचे जिल्हा परिषदांमधील निवडणूक विभाग व पंचायत समित्यांमधील निर्वाचक गण रचनेचे यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करून निवडणूक विभाग व निर्वाचक गण यासंबंधी प्रस्ताव तयार करण्याबाबत व आरक्षण फिरविणेबाबत पुढीलप्रमाणे नव्याने निदेश देत आहे :-

**जिल्हा परिषद क्षेत्राची निवडणूक विभाग व पंचायत समिती क्षेत्राची निर्वाचक गणांमध्ये विभागणी करणे :-**

(१) संबंधीत जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव तयार करुन तो विभागीय आयुक्त यांच्या मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे.

(२) संबंधीत जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून विभागीय आयुक्त यांचे नियंत्रणाखाली प्रारूप निवडणूक विभाग व प्रारूप निर्वाचक गण तयार करण्याचे काम योग्यप्रकारे तयार करून घ्यावयाचे आहे.

(३) प्रारूप निवडणूक विभाग व प्रारूप निर्वाचक गण तयार करताना संबधीत जिल्ह्यातील जिल्हा परिषद क्षेत्रांची किंवा यथास्थिती पंचायत समिती क्षेत्राची शेवटच्या प्रसिध्द झालेल्या जनगणनेनुसार आकडेवारी विचारात घ्यावयाची आहे. त्याबाबत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची आकडेवारीसुध्दा विचारात घ्यावयाची आहे.

(४) जिल्हा परिषद व पंचायत समिती यांची लोकसंख्या निश्चित करताना संबंधीत जिल्ह्यातील किंवा संबंधीत तालुक्यातील महानगरपालिका, नगर परिषदा / नगर पंचायती, कटक मंडळे (कन्टोनमेंट बोर्ड) यांची लोकसंख्या वगळून शिल्लक राहणारी लोकसंख्या विचारात घ्यावयाची आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती यांची लोकसंख्या निश्चित करताना संबंधीत क्षेत्रातील संपूर्ण ग्रामीण लोकसंख्या विचारात घेण्यात आली आहे याची खात्री करावी.

(५) जिल्हा परिषदेवर प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून द्यावयाची सदस्य संख्या कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ७५ अशी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य निवडणूक आयोग प्रत्येक जिल्हा परिषद क्षेत्राची व पंचायत समिती क्षेत्राची येणारी अनुक्रमे निवडणूक विभाग व निर्वाचक गणांची संख्या निश्चित करेल. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक विभाग व निर्वाचक गणांची संख्या निश्चित केल्यानंतर निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेचा प्रस्ताव तयार करावयाचा आहे.

(६) प्रत्येक निर्वाचक गण तयार करताना पंचायत समिती क्षेत्राची एकूण लोकसंख्या भागिले त्या पंचायत समितीस देय असलेली एकूण सदस्य संख्या याप्रमाणे सरासरी लोकसंख्या काढावी. निर्वाचक गण या सरासरी लोकसंख्येपेक्षा १० टक्के अधिक किंवा १० टक्के कमी लोकसंख्येच्या मर्यादेत राहून तयार करावयाचे आहेत.

(७) असे दोन निर्वाचक गण एकत्र करुन जिल्हा परिषदेचा एक निवडणूक विभाग तयार करावयाचा आहे.

(८) प्रत्येक पंचायत समिती क्षेत्राला किमान दोन निवडणूक विभाग व चार निर्वाचक गण असणे आवश्यक आहे. अशा ठिकाणी लोकसंख्येची सरासरी निवडणूक विभागाच्या सरासरी लोकसंख्येपेक्षा भिन्न असू शकेल.

(९) निवडणूक विभाग व निर्वाचक गण यांची रचना करताना प्रत्येक निवडणूक विभाग / निर्वाचक गण हा भौगोलिकदृष्ट्या सलग असला पाहिजे. त्याच्या सीमारेषा, रस्ते, नद्या, नाले इत्यादी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित कराव्यात. तसेच मोकळ्या जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणात गणली जातील याची दक्षता घ्यावी. निवडणूक विभाग व निर्वाचक गण तयार करताना प्रगणक गट शक्यतो फोडू नये. अपवादात्मक परिस्थितीत प्रगणक गट फोडल्यास त्या प्रगणक गटाचे सर्वेक्षण करून त्यावेळी शेवटच्या जनगणनेतील तेथील जनगणनेचे विभाजन कसे होते हे निश्चित करावे व त्यासंबंधीचे प्रमाणपत्र व प्रगणक गट का फोडावा लागला याचे कारण द्यावे. प्रगणक गट फोडल्यास भौगोलिक सीमा योग्यप्रकारे दाखविल्या जातील याची काळजी घेण्यात यावी. निवडणूक विभाग व निर्वाचक गण तयार करताना शक्यतो ग्रामपंचायत सीमांचा भंग होता कामा नये. जर ग्रामपंचायतीचे विभाजन करावयाचे असेल तर ते शक्यतोवर ग्रामपंचायतींच्या प्रभागानुसारच करण्यात यावे.

(१०) निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना सुरू करताना उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्येकडे त्यांनतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे रचना करताना सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. निवडणूक विभाग / निर्वाचक गण यांना क्रमांकही त्याच पध्दतीने द्यावेत.

(११) प्रत्येक निवडणूक विभाग / निर्वाचक गण सीमारेषेत फिरविताना उत्तर, पूर्व, पश्चिम, दक्षिण असा नमूद करावा. सीमारेषा तयार करताना त्या निवडणूक विभागातील / निर्वाचक गणातील कोणताही नकाशा निवडणूक विभागाची / निर्वाचक गणाची पूर्ण कल्पना येईल असा असावा याची काळजी घ्यावी.

(१२) निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचनेचा प्रस्ताव तयार करताना जिल्हा परिषद / पंचायत समितीच्या नकाशांमध्ये जनगणनेचे प्रगणक गट स्पष्ट दाखवावेत. प्रगणक गटाचे क्रमांकही दर्शविलेले असावेत, तसेच त्या निवडणूक विभागात / निर्वाचक गणात येणाऱ्या गावांची नावेही दर्शवावीत.

(१३) जिल्हा परिषद व पंचायत समिती यामधील जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गण यांचे नकाशे तयार करताना ग्रामपंचायत काळ्या रंगाच्या ठिपक्याने दर्शवावी व त्याच्या बाजूला त्या ग्रामपंचायतीचे नावही लिहिलेले असावे. जिल्हा परिषद क्षेत्रात समाविष्ट न करण्यात आलेले क्षेत्र हिरव्या रंगाने दर्शवावे. निवडणूक विभागाची हद्द लाल रंगाने व निर्वाचक गणाची हद्द निळ्या रंगाने दर्शवावी. जिल्ह्याचा एकत्रित आणि प्रत्येक पंचायत समितीचा वेगळा असे दोन स्वतंत्र नकाशे तयार करावेत. नकाशाखाली देण्यात येणाऱ्या

सूचीमध्ये कुठला रंग कशासाठी वापरण्यात आला आहे हे स्पष्ट करण्यात यावे. नकाशे सुस्पष्ट असावेत.

**आरक्षण :-**

(१) जिल्हा परिषदांमधील निवडणूक विभाग व पंचायत समित्यांमधील निर्वाचक गण यामध्ये अनुसूचित जातीची व अनुसूचित जमातींची लोकसंख्या किती आहे, त्यानुसार उतरत्या क्रमाने सर्व निवडणूक विभाग व निर्वाचक गण लावावेत. ज्या निवडणूक विभागात किंवा निर्वाचक गणात अनुसूचित जातींची किंवा अनुसूचित जमातींची लोकसंख्या जास्त असेल, ते निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण अनुसूचित जातीसाठी किंवा, यथास्थिती अनुसूचित जमातींसाठी आरक्षित होतील. त्यानंतर जिल्हा परिषदेमधील वेगवेगळ्या निवडणूक विभागांना तसेच पंचायत समित्यांमधील वेगवेगळ्या निर्वाचक गणांना फिरत्या पध्दतीने आरक्षण देईपर्यंत, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींकरीता राखून ठेवलेल्या जागा या अगोदरच्या सार्वत्रिक निवडणुकीत अशा जाती किंवा यथास्थिती, जमातींसाठी राखून ठेवण्यात आलेल्या नसतील अशा निवडणूक विभागात अथवा निर्वाचक गणात, पुढील निवडणुकांमध्ये फिरत्या ठेवण्यात येतील.

(२) एखादा निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती या दोन्हीसाठी आरक्षित होऊ शकत असेल तर त्याबाबतीत असा निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण अशा प्रवर्गांपैकी ज्याची लोकसंख्या जास्त असेल त्या प्रवर्गासाठी राखून ठेवण्यात येईल. उर्वरित प्रवर्गासाठी ज्या निवडणूक विभागात अथवा निर्वाचक गणात उतरत्या क्रमाने पुढील सर्वाधिक लोकसंख्या असेल, तिथे त्या प्रवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येईल.

(३) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठीचे सोडत काढून आरक्षण निश्चित करण्यात यावे. सोडत काढताना अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झालेले निवडणूक विभाग / निर्वाचक गण वगळण्यात यावेत. तसेच मागील निवडणुकीच्यावेळी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखून ठेवण्यात आलेले निवडणूक विभाग / निर्वाचक गण वगळण्यात यावेत.

(४) ज्या निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गणाची पुनर्रचना करण्यात आली असेल त्या निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गणावर मागील निवडणुकीमध्ये कोणते आरक्षण होते हे ठरविण्यासाठी त्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या गावांवर मागील निवडणुकीमध्ये असलेले आरक्षण विचारात घ्यावे. मागील निवडणुकीत एकाच प्रकारचे आरक्षण असलेल्या गावांच्या लोकसंख्येची लगतच्या जनगणनेनुसारची बेरीज, पुनर्रचित निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या एकूण लोकसंख्येच्या ५०% पेक्षा जास्त असेल तर त्या गावांवर असलेले आरक्षण मागील निवडणुकीमध्ये पूनर्रचित निवडणूक विभाग / निर्वाचक गण असल्याचे मानण्यात यावे.

(५) अनुसूचित जातीच्या महिला, अनुसूचित जमातीच्या महिला तसेच नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या महिला यासाठी आरक्षण त्या प्रवर्गासाठी आरक्षित होणाऱ्या निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गणामधून सोडतीने ठरविण्यात यावे.

(६) **अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी एकच** निवडणूक विभाग किंवा एकच निर्वाचक गण आरक्षित होत असल्यास तो अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती, किंवा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी आरक्षित होईल किंवा कसे, हे सुध्दा सोडतीने ठरविण्यात यावे व त्यानंतर हे आरक्षण आळीपाळीने देण्यात यावे.

(७) **महिलांचे आरक्षण** एकाच निवडणूक विभागात किंवा निर्वाचक गणात राहू नये, त्या आरक्षणाचा लाभ सर्वच निवडणूक विभागांना किंवा निर्वाचक गणांना मिळावा यासाठी लगतच्या निवडणुकीत जे निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण महिलांसाठी आरक्षित झाले असतील तेथे शक्यतोवर पुन्हा महिलांचे आरक्षण येणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

(८) अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या संपूर्ण पंचायत समित्यांसाठी अनुसूचित जमातींसाठी आरक्षित निर्वाचक गणाचे आरक्षण फिरविताना जे निर्वाचक गण आधीच्या निवडणुकीत अनुसूचित जमातींव्यतिरिक्त इतरांसाठी आरक्षित असतील किंवा अनारक्षित असतील तेथे अनुसूचित जमातींचे आरक्षण द्यावे.

(९) अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या अशा पंचायत समित्यांमध्ये की जेथे संपूर्ण निर्वाचक गण अनुसूचित जमातींसाठीच आरक्षित असतील तेथे फक्त अनुसूचित जमाती महिला हे आरक्षण बदलण्यात यावे.

(१०) जिल्हा परिषद क्षेत्रातील सर्व निवडणूक विभागामध्ये सर्व प्रकारचे आरक्षण आळीपाळीने फिरविण्यात यावे व प्रत्येक प्रकारचे आरक्षण सर्व निवडणूक विभागामध्ये फिरविल्यानंतर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची सुरुवात पुन्हा ज्या निवडणूक विभागामध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या जास्त आहे तिथपासून अनुसूचित जातीचे आरक्षण सुरू करावे. ज्या निवडणूक विभागात अनुसूचित जमातींची लोकसंख्या सर्वात जास्त आहे तिथपासून अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची सुरुवात करण्यात यावी. हीच पध्दत निर्वाचक गणाबाबतही वापरण्यात यावी.

(११) एखाद्या जिल्ह्यात अपवादात्मक परिस्थितीमध्ये त्याच निवडणूक विभागावर किंवा निर्वाचक गणावर जुनेच आरक्षण पुन्हा येण्याची शक्यता आहे. ते आरक्षण पुन्हा येऊ नये यासाठी सर्व प्रयत्न झाल्यानंतर ते आरक्षण पुन्हा येणारच असेल तर ते येऊ देण्यास हरकत नाही.

(१२) निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचना यांची प्राथमिक अधिसूचना प्रसिध्द केल्यानंतर त्यावर प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना यांना सुनावणी देण्याचे अधिकार विभागीय आयुक्त ह्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

(१३) आरक्षणासंबंधी "आरक्षण" या सदराखाली नमूद केलेले अनुक्रमांक १ ते १२ विचारात घेऊन आरक्षणाची सोडत काढण्यात यावी. राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचनेच्या सोडतीचा कार्यक्रम देण्यात आल्यानंतर सोडतीसंबंधीची सूचना सोडत काढण्यापूर्वी संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय व पंचायत समिती कार्यालय येथे नोटीस बोर्डावर लावण्यात यावी. तसेच यासंबंधी जाहिरात, जिल्ह्यातील जास्त वाचकवर्ग असलेल्या वर्तमानपत्रात देण्यात यावी.

नीला सत्यनारायण
(नीला सत्यनारायण) ६/१०/११
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,

१) सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

निर्गमित
दिनांक ७/१०/११
सही

D:\ZPPS-2012 reservation order.doc

**जिल्हा परिषद क्षेत्राची निवडणूक विभागामध्ये पंचायत समिती क्षेत्राची निर्वाचक गणामध्ये विभागणी करण्याबाबत**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ११/०६/२०१४

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का-७, दि.०४ ऑक्टोबर, २०११ चे आदेश

**शुध्दीपत्रक :-**

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का-७, दि.०४ ऑक्टोबर, २०११ च्या आदेशामधील आरक्षण या सदराखालील **अनुक्रमांक** ३ व ७ मध्ये नमूद करण्यात आलेल्या मजकूराऐवजी खालीलप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यात आला आहे असे वाचण्यात यावे.

**अनुक्रमांक ३-** नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागांचे आरक्षण सोडत काढून निश्चित करण्यात यावे. सोडत काढताना अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झालेले निवडणूक विभाग / निर्वाचक गण वगळण्यात यावेत. तसेच **अगोदरच्या** सार्वत्रिक निवडणुकीत नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखून ठेवण्यात आलेले निवडणूक विभाग / निर्वाचक गण वगळण्यात यावेत.

**अनुक्रमांक ७-** महिलांचे आरक्षण एकाच निवडणूक विभागात किंवा निर्वाचक गणात राहू नये, त्या आरक्षणाचा लाभ सर्वच निवडणूक विभागांना किंवा निर्वाचक गणांना मिळावा यासाठी

**अगोदरच्या** निवडणुकीत जे निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण महिलांसाठी आरक्षित झाले असतील तेथे शक्यतोवर पुन्हा महिलांचे आरक्षण येणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( पूनम शिरसोळकर )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
१) सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

( आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-2016/प्र.क्र.16 /का.7, दि.18/08/2016 सोबतचे प्रपत्र)

## प्रपत्र - १

## सातारा जिल्हा परिषदेत अनुज्ञेय ठरत असलेल्या निवडणूक विभागांच्या संख्येबाबतचा तपशील

| SR. NO. | DISTRICT | TOTAL POPULATION AS PER CENSUS 2011 | RATIO 124355 (DECIMAL) | CENSUS POPULATION 2011 | | | Z.P. SEATS | TOTAL WOMAN | DETAILS REGARDING RESERVATION | | | | | | | | P.S. SEATS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | GEN | | SC | | ST | | BCC | | |
| | | | | TOTAL | SC | ST | | | T | W | T | W | T | W | T | W | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 8 | SATARA | 2517154 | 14.30 | 2517154 | 259288 | 23547 | 64 | 32 | 39 | 18 | 7 | 4 | 1 | 1 | 17 | 9 | 128 |

## जिल्हा परिषद सदस्य संख्या निश्चित करण्याचे सूत्र

" क्ष " म्हणजे राज्याच्या जिल्हयातील सर्वात जास्त लोकसंख्या (पुणे - **3847332** ) **-75**

" य " म्हणजे राज्याच्या जिल्हयातील सर्वात कमी लोकसंख्या (सिंधुदुर्ग - **738447** ) **- 50**

नियमातील सुत्रानुसार = $\frac{(\text{क्ष} - \text{य})}{25} = \frac{(3847332 - 738447)}{25} = \frac{(3108885)}{25} = 124355$

## प्रपत्र - २

## सातारा जिल्हा परिषदेतील अनुज्ञेय जागांचा पंचायत समिती क्षेत्रनिहाय तपशिल तसेच पंचायत समित्यांना अनुज्ञेय ठरत असलेल्या जागांचा तपशील

| SR. NO. | DISTRICT | PANCHAYAT SAMITI | CENSUS POPULATION 2011 | | | DECIMAL | ADMISSIBLE SEATS | | TOTAL WOMEN | Reservation | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | TOTAL | SC | ST | | ZP | PS | | GEN | | SC | | ST | | BCC | |
| | | | | | | | | | | T | W | T | W | T | W | T | W |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | SATARA | KHANDALA | 111863 | 9423 | 1287 | 2.84 | 3 | 6 | 3 | 3 | 2 * | 1 | * | 0 | 0 | 2 | 1 |
| 2 | | PHALTAN | 290549 | 40539 | 2350 | 7.39 | 7 | 14 | 7 | 8 | 4 | 2 | 1 | 0 | 0 | 4 | 2 |
| 3 | | MAN | 185669 | 22973 | 360 | 4.72 | 5 | 10 | 5 | 6 | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 3 | 2 |
| 4 | | KHATAV | 257638 | 23706 | 1604 | **6.55** | **6** | 12 | 6 | 8 | 4 | 1 | 0 | 0 | 0 | 3 | 2 |
| 5 | | KOREGAON | 215177 | 18396 | 1268 | 5.47 | 5 | 10 | 5 | 6 | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 3 | 2 |
| 6 | | WAI | 164244 | 14547 | 3815 | 4.18 | 4 | 8 | 4 | 5 | 3 * | 1 | * | 0 | 0 | 2 | 1 |
| 7 | | MAHABALESHWAR | 44543 | 3599 | 2993 | **1.13** | **2** | 4 | 2 | 3 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 |
| 8 | | JAWALI | 101828 | 7064 | 1749 | 2.59 | 3 | 6 | 3 | 4 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 |
| 9 | | SATARA | 381854 | 39985 | 3854 | 9.71 | 10 | 20 | 10 | 13 | 6 | 2 | 1 | 0 | 0 | 5 | 3 |
| 10 | | PATAN | 285730 | 23870 | 1761 | 7.26 | 7 | 14 | 7 | 9 | 5 | 1 | 0 | 0 | 0 | 4 | 2 |
| 11 | | KARAD | 478059 | 55186 | 2506 | 12.15 | 12 | 24 | 12 | 15 | 7 | 3 | 2 | 0 | 0 | 6 | 3 |
| | | **TOTAL** | **2517154** | **259288** | **23547** | **64.00** | **64** | **128** | **64** | **80** | **40 *** | **13** | **5 *** | **0** | **0** | **35** | **19** |

सातारा जिल्हा परिषदेमध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी एकच जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जमाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होईल.

माण, खटाव, पाटण या ३ पंचायत समिती मध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता प्रत्येकी १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होणार नाही.

कोरेगाव पंचायत समिती मध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता फक्त १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होईल.

खंडाळा व वाई पंचायत समितीमध्ये प्रथमच अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता प्रत्येकी १ जागा आरक्षित होत आहे. सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) करिता आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीद्वारे ठरवावे लागेल. सोडतीमध्ये सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) प्रवर्गासाठी आरक्षित झाल्यास सर्वसाधारण (स्त्री) प्रवर्गासाठीच्या जागा त्या प्रमाणात कमी होतील.

महाबळेश्वर पंचायत समिती मध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरिता फक्त १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे या निवडणुकीमध्ये सदर जागा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) साठी आरक्षित होणार नाही.